PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bala Jo Jo Re
Year: 1951

Song: Nilya Nabhatun Janu utarali
Lyricist: G. D. Madgulkar

निळया नभातून जणू उतरली
निळया नभातून जणू उतरली
धरतीच्या अंगणी
निळया नभातून जणू उतरली
धरतीच्या अंगणी
पाहून लाजली मला
ही शुक्राची चांदणी
नको बहाणा लटका लटका
नको बहाणा लटका लटका
चोरून पाहील कुणी
नको बहाणा लटका लटका
चोरून पाहील कुणी
भुलणार नाही रे तुला
ही शुक्राची चांदणी
निळया नभातून जणू उतरली
धरतीच्या अंगणी

हिरव्या रानात आंबे वनात
पंचम सूर मंजुळा
हिरव्या रानात आंबे वनात
पंचम सूर मंजुळा
तुझ्या गळयातून गाऊ लागली
तुझ्या गळयातून गाऊ लागली
कुहू कुहू कोकीळा
शृंगार बासरीवरी
हा राग छेडीला कुणी

हा नको बहाणा लटका लटका
चोरून पाहील कुणी
भुलणार नाही रे तुला
ही शुक्राची चांदणी
निळया नभातून जणू उतरली
धरतीच्या अंगणी
तालात सुरात पहिल्या भरात
जीव नाचतो पिसा
तालात सुरात पहिल्या भरात
जीव नाचतो पिसा
नको उतावीळ होऊ वेडया
नको उतावीळ होऊ वेडया
नको घाबरू असा
एकांत राहीला मुका
ही भेट अशी देखणी
निळया नभातून जणू उतरली
धरतीच्या अंगणी
पाहून लाजली मला
ही शुक्राची चांदणी
हो नको बहाणा लटका लटका
चोरून पाहील कुणी
भुलणार नाही रे तुला
ही शुक्राची चांदणी
ही शुक्राची चांदणी
ही शुक्राची चांदणी
ही शुक्राची चांदणी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*